**निशाणी क्र. ५२ वरील आदेश**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार अर्ज दाखल केला आहे.

२. वादी याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. १ व २ यांनी मयत रुक्मिणी कृष्णा मालंडकर हिचे वारस असल्याचा दाखला मिळणेसाठी न्यायालयात अर्ज केला होता. मयत कै. रुक्मिणी हिला वादी तसेच अन्य प्रतिवादी सुध्दा वारस असताना सदर अर्जाचे कामी त्यांना पक्षकार केले नव्हते. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी मे. न्यायालयास चुकीची माहिती देवून वारसा दाखला मिळविला व त्याआधारे दावा मिळकतीचे अभिलेखात आपली नावे कै. रुक्मिणी हिचे वारस म्हणून नोंदवून घेतली. सदर कामी वादी अगर प्रतिवादींना कोणतीही नोटीस काढण्यात आली नाही. वादीने प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरुध्द दावा मिळकत कोणासही हस्तातरित करु नये व सदर मिळकतीत बांधकाम करु नये यासाठी तुर्तातुर्त ताकीदची मागणी केली होती. सदरची मागणी न्यायालयाने मंजूरही केली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी घाईगडबडीने सदर मिळकतीचे खरेदीपत्र दिनांक ०५/०५/२०१५ इ. रोजी म्हणजेच दावा दाखल करण्याच्या एक दिवस अगोदर नियोजित प्रतिवादी क्र. १८ मधुकर विठोबा धावडे यास करुन दिले आहे. वादीने दावा मिळकतीचा उतारा काढला असता सदर मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नियोजित प्रतिवादी क्र. १८ मधुकर विठोबा धावडे याचे नाव दाखल असल्याचे आढळून आले. तसेच त्यासंबंधीचा फेरफार उताराही मिळविला असता प्रतिवादींनी केलेल्या हस्तांतरण व्यवहाराची माहिती वादीस मिळाली आहे. नियोजित प्रतिवादी क्र. १८ हा याकामी आवश्यक पक्षकार आहे. त्यामुळे सदर दाव्यास आवश्यक पक्षकारांची उणिव राहू नये म्हणून वादी याने नियोजित प्रतिवादी यास आवश्यक पक्षकार म्हणून दाव्याच्या सरनाम्यात समाविष्ठ करण्यासाठी विनंती केली आहे. तसेच

सदरचा खरेदी व्यवहार वादीच्या हिश्श्यावर बंधनकारक नाही असा ठराव होवून मिळणेसाठी दाद मागणेबाबत व नियोजित प्रतिवादी क्र. १८ याने दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत करु नये अशी दाद मागणेबाबत दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेची विनंती वादीने केली आहे.

**३.** नियोजित प्रतिवादी क्र. १८ याने निशाण क्र. ७४ ला म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याचे म्हणणे नुसार अर्जातील मजकूराशी प्रस्तुत प्रतिवादीचा काहीही संबंध नाही. प्रस्तुत प्रतिवादीने सदरचा खरेदी व्यवहार घाईगडबडीत केला नसून आवश्यक ती कागदपत्रे तपासून केला आहे. खरेदीखताबाबत ठरावाची मागणी केली असल्यामुळे दाव्याच्या आकारणीमध्ये पुर्णपणे बदल होणार आहे. वादीने आकारणीबाबत दुरुस्तीची मागणी केली नाही अगर जादा न्यायालयीन शुल्क देण्याची तयारी दर्शविली नाही. यबब, या कारणास्तव सदरचा अर्ज फेटाळण्याची प्रस्तुत प्रतिवादीने विनंती केली आहे.

**४.** वादी व प्रतिवादी क्र. १८ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**५.** नियोजित प्रतिवादी याने दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन घेतले आहे याबाबत वाद नाही. वादी याने दावा मिळकतीमध्ये त्याचे हक्क व अधिकार आहेत असे कथन केले आहे. त्यामुळे दावा दाखल करण्याच्या एक दिवस आधी नियोजित प्रतिवादी क्र. १८ याच्या नावे झालेले खरेदीपत्राबाबत अधिकार घोषणेची व त्याच्याविरुध्द मनाईची दाद मागणेचा वादीला अधिकार आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास वादीला परवानगी देणे न्यायोचित वाटते.

**६.** वादी हा दुरुस्तीद्वारे हक्क घोषणेची दाद मागू इच्छित आहे. मात्र त्याने त्याबाबत दाव्याची आकारणी संदर्भात काहीच खुलासा केला नाही. सबब, सदर अधिकार घोषणेच्या दादीबाबत दाव्याची आकारणी करुन त्याबाबत लागणारा न्यायालयीन शुल्क जमा करणेबाबत वादीस निर्देश देणे आवश्यक वाटते. केवळ वादीने या आकारणीबाबत काहीच खुलासा केला नाही या कारणास्तव अर्ज फेटाळणे उचित वाटत नाही.

**७.** प्रस्तुत कामी अदयाप मुद्दे निश्चित करण्यात आले नाहीत अगर पुराव्याचे कामकाज सुरु झाले नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुतची दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित वाटते.

**८.** सबब, वरील सर्व कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी याने पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये दुरुस्ती करावी व दावा दुरुस्त प्रत द्यावी.

३. वादी याने दुरुस्तीद्वारे मागितलेल्या दादीबाबत दाव्यामध्ये आकारणी करुन योग्य तो न्यायालयीन शुल्क जमा करावा.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

देवगड
दिनांक १५/०२/२०१७

( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.